# भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ मधील प्रकरण २१ अन्वये कलम २७४ अन्वये
# संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ०५/२०२६ चा अभिलेख

## मालवण येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

**निशाणी**

| | | |
|---|---|---|
| १) अपराध घडल्याचा दिनांक | : | ०२/१०/२०२५ |
| २) फिर्याद दाखल केल्याचा दिनांक | : | ०२/१०/२०२५ |
| ३) फिर्यादीचे नाव, वय व पत्ता | : | महादेव अभिनाथ घागरे, वय ३५ वर्षे<br>धंदा- नोकरी,पो.कॉ.१७८<br>नेमणुक- मालवण पोलीस स्टेशन |
| ४) आरोपीचे नाव, वय व पत्ता | : | चेतन मनोहर कांदळगावकर,<br>वय- ४५ वर्षे, धंदा - मोलमजुरी<br>रा. कांदळगाव, राणेशेमाडवाडी,<br>ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग |
| ५) अपराधाचा तपशील | : | |

तुम्ही दि. ०२/१०/२०२५ रोजी मौजे मालवण येथील देवूळवाडा नाका येथील जुन्या आईस फॅक्टरीसमोर तुमचे ताब्यात एका प्लॅस्टीकच्या पिशवीमध्ये गोवा बनावटीच्या बॉब्स लेमन व्होडकाच्या १८० मिली मापाच्या १२ बाटल्या गैरकायदा बिगरपरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने आपल्या ताब्यामध्ये बाळगलेल्या स्थितीत मिळून आला व त्याद्वारे तुम्ही महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) द्वारे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

६) आरोपीचे प्रतिकथन :

प्रश्न क्र. १ : अभियोग पक्षाच्या कागदपत्रांच्या प्रती तुम्हाला मिळाल्यात काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.२ : अपराधाचा जो तपशील तुम्हाला वाचून व स्पष्ट करुन सांगण्यात आला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.३ : तुम्हाला गुन्हा मान्य आहे काय ?

उत्तर : मला गुन्हा मान्य नाही.

–––––––––––––––

दिनांक : ०९/०६/२०२६ (आरोपीची सही )

समक्ष,

( एम.के.फकीह )
न्यायदंडाधिकारी वर्ग–१, मालवण

आरोपीला गुन्हयाबाबतचा तपशिल वाचून दाखविला व मराठीतून समजावून सांगितला असता आरोपीने गुन्हा नाकबूल करुन अभियोग चालविण्याची तयारी दर्शविली.

( एम.के.फकीह )
दिनांक : ०९/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१, मालवण